**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र**
**जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे कार्यालय**
**रोहयो शाखा, दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टोकरतलाव रोड, नंदुरबार-४२५४१**
**दुरध्वनी क्रमांक - ०२५६४-२१००२९ ई-मेल :- egsdycoll.ndb-mh@gov.in**

क्रमांक/मग्रारोहयो/आस्था/ 113/2020
रोहयो शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,
नंदुरबार दिनांक :- 16/10/2020

**ई- निविदा जाहीर सूचना**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र अंतर्गत कामकाजाकरीता जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना कार्यालयीन वापरासाठी टोयोटा इनोव्हा क्रिस्टा या वाहन प्रकाराचे एक वाहन इंधन खर्चाशिवाय व वाहनचालकाशिवाय भाडेतत्वावर घेण्याकरीता दोन लिफाफा पदधतीने ई - निविदा मागविण्यात येत आहे.

- निविदेबाबत सविस्तर माहिती शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
- सदर ई - निविदा उक्त संकेत स्थळावर दि. २० /१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ऑनलाईन स्वरुपात सादर करता येईल.
- सदर ई - निविदा सादर करण्याचा अंतीम दि. २६ /१०/२०२० आहे.
- ई- निविदा शुल्क रु.२८००/- इतके असून सदर रक्कम ऑनलाईन पदधतीने भरणे बंधनकारक आहे.
- सदर ई -निविदेची अंदाजित रक्कम रु. ५.०० लाख आहे.
- वाहन भाडेतत्वावर घेण्याचा कालावधी १२ महिने आहे.
- ई- निविदा भरण्याकरीता बयाना रक्कम रु.१४०००/- इतकी असून सदर रक्कम ऑनलाईन पदधतीने भरणे बंधनकारक आहे.
- सदर ई - निविदा दि. २७ /१०/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येईल.
- या निविदेची पुढील सर्व कार्यवाही व शुध्दीपत्रके ही http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरच उपलब्ध करण्यात येतील .

एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा रदद करण्याचा अधिकार तसेच अटी व शर्ती शिथील करण्याचे किंवा बदल करण्याचे व रदद करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचेकडे राखून ठेवले असून त्याबाबतचे सर्व निर्णय सर्व निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

**(डॉ.राजेंद्र भारुड)**
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**

## निविदा भरतांना आवश्यक कागदपत्रे

**पाकिट क्र. १ मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे असावीत.**

१. वाहनाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र (Vehicle Registration Certificate )

२. वाहन प्रवासी वाहतूक नोंदणी प्रमाणपत्र ( Tourist Permit )

३. वाहनाचा अदययावत विमा भरल्याची पावती ( Comprehensive Insurance )

४. निविदा धारकाचे पॅन कार्ड प्रत

(उपरोक्त सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा अपात्र ठरवण्यात येईल. )

**पाकीट क्र . २ मध्ये खालील प्रमाणे आवश्यक बाबी असाव्यात.**

१. पाकिट क्र. २ (BOQ) मध्ये वाहनाचे मासिक भाडे ( इंधनाशिवाय व वाहनचालकाशिवाय ) सर्व करांसह नमूद करावे.

**(डॉ.राजेंद्र भारुड)**
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**

**अटी व शर्ती :-**

१) निविदा दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन सादर करावयाची आहे. (लिफाफा 'अ' हा तांत्रिक लिफाफा असून लिफाफा 'ब' दराचा लिफाफा आहे). निविदा धारकाने लिफाफा 'अ' मधील सर्व बाबींची पूर्तता केली असेल, तरच त्याचा लिफाफा 'ब' उघडण्यात येईल.

२) निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदे संबंधीच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक किंवा इतर माहिती पुरविण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबंधीचे निविदाधारकाचे प्राधिकार पत्र (bidders power of attorney) देणे आवश्यक राहील.

३) निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त स्वतःची अट / शर्त निविदेमध्ये समाविष्ट करु नये. अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४) निविदा संदर्भात निविदा प्रक्रिये दरम्यान किंवा निविदा स्वीकृती नंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास जिल्हाधिकारी नंदुरबार यांचा निर्णय अंतिम राहील.

५) अपूर्ण माहिती असलेला निविदा फॉर्म बाद करण्यात येईल.

६) निविदा मंजूर करणे अथवा नाकारणे, आवश्यक वाटल्यास अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा किंवा दरासंदर्भात तडजोड (Negotiation) करणेबाबतचे सर्व हक्क जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडेस राखून ठेवणेत आलेले आहेत.

७) बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

८) वाहन महाराष्ट्र राज्य पासिंग असावे.

९) वाहनाचा रंग पांढरा असावा.

१०) वाहन नोंदणी (Vehicle Registration Certificate ) दि. ०१/०१/२०१८ नंतरचे असावे.

११) वाहन टोयोटा इनोव्हा क्रिस्टा या प्रकारचे असावे. तसेच सदर वाहनास BUCKET SEAT नसावे.

१२) पुरविण्यात आलेले वाहन सदैव सुस्थितीत व स्वच्छ केलेले असावे.

१३) जिल्हा परिवहन प्राधिकरण, नंदुरबार यांच्या दिनांक २८/११/२०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांत नमुद केलेल्या मर्यादेत वाहनाचे मासिक भाडयाचे दर असावेत.

१४) आवश्यकतेनुसार पाकिट क्र.२ (BOQ) मध्ये कमीत कमी दर नमूद करण्यात आलेल्या निविदाधारकाशी मासिक भाडयाचे दर / रकमेबाबत या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार वाटाघाटी करुन भाडयाचे दर अंतिम करण्याचे सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे राहतील.

१५) बयाणा रक्कम रु. १४,०००/- व निविदा शुल्क रक्कम रु. २८००/- ऑनलाईन पध्दतीने भरणे बंधनकारक आहे.

१६)यशस्वी निविदा धारकास सुरक्षा अनामत रक्कम ही आदेश मुल्याच्या ३ % (वार्षिक मुल्य) रकमेइतकी राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राप्टव्दारे स्विकृती दिनांकापासून ३ दिवसांच्या आत या कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक राहील. त्याशिवाय कार्यारंभ आदेश निर्गमित केले जाणार नाही.

१७) शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या वस्तू व सेवा (GST ) करानुसार रक्कम कपात करुन उर्वरीत देयकाची रक्कम अदा करण्यात येईल. तसेच देयकातून देय असलेले आयकर व इतर देय कराची रक्कम कपात केली जाईल.

१८) निश्चित केलेल्या दरानुसार देयक कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या निधीतून अदा करण्यात येतील. तसेच देयकाव्यतीरीक्त इतर कोणताही छुपा खर्च लावल्यास ग्राहय धरले जाणार नाही.

१९) एकापेक्षा जास्त निविदाधारकांनी सादर केलेला दर समान असल्यास, वाहनाच्या निर्मिती तारखेनुसार नुतन वाहनास प्राधान्य देण्यात येईल.

२०) वाहन भाडयाने लावलेल्या कार्यालयास शासकीय वाहन मिळाल्यास / वाहनाची आवश्यकता नसल्यास पुरवठादारास सात दिवसांची नोटीस देऊन भाडयाने लावलेले वाहन बंद करण्यात येईल

२१) वाहनासाठी वंगण, दुरुस्ती ,वाहनाचा विमा, वाहनाचे परतफेडीचे हप्ते, व इतर सर्व कर, इ. सर्व खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे .तसेच वाहनाचे टोल व पार्किंग चार्जस कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.

२२) वाहनाची सर्व कागदपत्रे, अद्यावत विमा, वाहनाची नोंदणी, सर्व प्रकारचे टॅक्सेस ,तसेच वाहन / रस्ता सुरक्षा / विमा ईत्यादी बाबत शासन वेळोवेळी कायदे व नियम अमलात आणेल त्याप्रमाणे सर्व कागदपत्रे अद्यावत करणे आवश्यक आहें. तसेच आवश्यक परवाने वेळोवेळी अद्यावत करण्याची जबाबदारी पुरवठादाराचीच राहील, त्यांचे कोणतेही दायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

२३) करार कालावधी मध्ये वाहनाचा अपघात झाल्यास जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी व कायदेशीर दायित्व फक्त पुरवठादाराचे राहील. तसेच वाहनाचे सर्व कागदपत्रे वाहनात ठेवणे बंधनकारक राहील.

२४) किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एक दिवसाच्या आत व मोठया स्वरुपाची दुरुस्ती तीन दिवासाच्या आत करुन देण्याची तसेच सदर कालावधीमध्ये पर्यायी वाहन सेवा पुरवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. पर्यायी वाहनाची व्यवस्था करुन न दिल्यास वाहन सेवा गैरहजर बाबत मासिक भाडयाने दर लक्षात घेता प्रती दिन प्रमाणे येणारी रक्कम देयकातुन कपात करण्यात येईल किंवा पुरवठादाराने त्यांच्याकडील वाहन नादुरुस्त अथवा इतर कारणांमुळे उपलब्ध करुन न दिल्यास त्या कालावधीत या कार्यालयाने इतर वाहन भाडयाने घेतल्यास त्यासाठी झालेल्या खर्च पुरवठादाराला द्यावयाच्या रकमेतुन कपात केला जाईल.

२५) यशस्वी निविदा धारकांने पुरवठा केलेल्या वाहनावर कोणत्याही कारणास्तव दिवाणी अथवा फौजदारी दावा न्यायालयात दाखल नसावा.

२६) ज्या दिवशी वाहन कार्यालयात उपलब्ध झाले नाही. त्या दिवसाची दंड आकारण्यात येईल दंडांची रक्कम प्रती दिन देय होण-या रकमेनुसार आकारुन ,पुरवठादाराच्या देयकातुन वजावट करण्यात येईल .

२७) वाहनाचा वापर ग्रामीण भागात, डोगराळ भागत, अतिदुर्गम भागात करण्यात येईल. तसेच आवश्यक असल्यास जिल्हा/ राज्याबाहेरही वाहनाचा वापर करण्यात येईल .

२८) वाहनाच्या दर्शनी भागावर शासकीय कर्तव्यार्थ (ON GOVT.DUTY) असे लिहीने बंधनकारक राहील. या कार्यालयाने वाहनाचा वापर बंद केल्यानंतर सदर नाव काढुन टाकणे बंधनकारक राहील, तसेच वाहनावर इतर कोणताही मजकूर अथवा चित्र असू नये.

२९) पुरविण्यात आलेल्या वाहनाकरीता कार्यालयाकडून लॉगबुक पुरविण्यात येईल. वाहन चालकाने लॉगबुक अद्यावत करुन ते प्रमाणित केल्यानंतर देयक सादर करावे. त्यानंतरच मासिक भाडे अदा केले जाईल.

३०)वाहन दुरुस्तीसाठी नेले असल्यास त्याची धावसंख्या तसेच दररोज वाहन कार्यालयास आणण्याकरीता केलेली धावसंख्या ही कार्यालयीन धावसंख्ये मध्ये असणार नाही. तसेच पुरवठादाराने कार्यालयीन वापरा व्यतिरिक्त वाहनाचा वापर केल्यास सदर धावसंख्या एकूण धावसख्यां मधून वजा करण्यात येईल.

३१)करार कालावधीत मासिक दरात कुठल्याही प्रकारे बदल केला जाणार नाही .

३२) वाहनामध्ये जॅक, टॉमी, स्टेपनी, टुल, कटी, प्रथमोचार पेटी, दोरखंड, टॉर्च इ . असणे आवश्यक आहे.

३३) वाहन २४ तास संबधित अधिका-यांकडे उपलब्ध असावे. सार्वजनिक सुटटीच्या दिवशीही वाहन पुरविणे आवश्यक आहे. तसेच वाहन भाडयाने लावण्याची करार असेपर्यंत पुरवठादाराला कोणत्याही परिस्थित वाहनाचा खाजगी कामासाठी वापर करता येणार नाही. असे आढळून आल्यास पुरवठादाराचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल व उर्वरीत देयक अदा केले जाणार नाही .

३४) करार कालावधीत पुरवठादाराने पुरविलेल्या वाहनाची विक्री / हस्तांतरण करता येणार नाही.

३५) निविदा स्वीकृती नंतर पात्र निविदाधारकास 03 दिवसात रु. 100/- चे स्टॅप पेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करुन दयावा लागेल. विहित कालावधीत करारनामा सादर न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व इतर पात्र निविदाधारकास वाहन भाडे तत्वावर पुरविण्याकरीता कळविण्यात येईल.

३६) सदर करारनामा आदेश दिल्यापासून १२ महिने कालावधीसाठी राहील.

**(डॉ.राजेंद्र भारुड)**
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**